N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड  **P.S.(ठाणे):** अंबाजोगाई शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0151  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/04/2023 03:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 18/04/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/04/2023

**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/04/2023  **Time (वेळ):** 02:39 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/04/2023 02:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर परिषद, कार्यालय,नगर परिषद, कार्यालय, अंबाजोगाई,अंबाजोगाई, 431517

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अशोक किसनराव देशमुख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1972

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खडकपुरा,खडकपुरा,अंबाजोगाई,अंबाजोगाई,अंबाजोगाई शहर,बीड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | खडकपुरा,खडकपुरा,अंबाजोगाई,अंबाजोगाई,अंबाजोगाई शहर,बीड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9623060635

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आत्माराम जिवनराव चव्हाण | | | 1. एमआयटी रोड, नागझरी परिसर, श,एमआयटी रोड, नागझरी परिसर, श,अंबाजोगाई, अंबाजोगाई,अंबाजोगाई शहर, बीड,महाराष्ट्र,भारत-431517 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय बीड

दिनांक:- 19/04/2023

मी अशोक किसनराव देशमुख, वय 51 वर्ष, व्यवसाय शेती, रा.खडकपुरा, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड मो. नं. 9623060635.
मी आज दिनांक 19/04/2023 रोजी ला.प्र.वि.कार्यालय, बीड येथे श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन शेती करतो. मी दिनांक 18/04/2023 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.बीड यांचे समक्ष अंबाजोगाई येथे तक्रार दिली की, "माझे व माझे वडील नाने किसनराव सदाशिव देशमुख यांचे नावे खडकपुरा ता.अंबाजोगाई येथे 25 X 22 इतक्या जागेत जुने घर दोघांचे नावे आहे. सदर जागा ही पुर्णपणे माझे नावावर करण्यासाठी माझे वडीलांनी रजिस्ट्री कार्यालय, अंबाजोगाई येथुन हक्कसोड पत्र केले. त्यावरुन सदर जागा ची पी.टी.आर.ला नोंद घेण्यासाठी मी दिनांक 17/03/2023 रोजी नगर परिषद, अंबाजोगाई येथे फाईल दाखल केली. पेपरला जाहीरनामा आल्याच्या नंतर पंधरा दिवस झाल्यावर मी दिनांक 10/04/2023 रोजी नगर परिषद, अंबाजोगाई येथील श्री. चव्हाण साहेब यांना जावुन भेटलो असता, त्यांनी मला सदर जागेची पी.टी.आर.ला नोंद घेण्यासाठी शासकीय फीस 3000/- रुपये व त्या व्यतीरिक्त 3000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत." वगैरे मजकुराची तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 18/04/2023 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, बीड यांनी श्री.चव्हाण हे माझ्याकडे माझे काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक-1 श्री.वडचकर यांना नगर परिषद, अंबाजोगाई येथे श्री.चव्हाण साहेब यांना भेटण्यासाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यानुसार श्री.शंकर शिंदे यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देउन व्हाईस रेकॉर्डचे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंच क्रमांक-1 श्री.वडचकर यांना श्री.चव्हाण साहेब यांचेकडे नगर परिषद, अंबाजोगाई येथे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व चव्हाण साहेब यांची नगर परिषद, अंबाजोगाई येथील श्री.चव्हाण साहेब यांचे कक्षात भेट झाली. त्यावेळी माझेत व श्री.चव्हाण साहेब यांचेत कामाबाबत बोलणे झाले. त्यावेळी त्यांनी मला माझे व माझे वडीलांची नावे खडकपुरा येथील असलेल्या जागेची नोंद पुर्णपणे पी.टी.आर. माझे नावे करण्यासाठी शासकीय फीस 3,000/- रुपये व पी.टी.आर. ला नाव लावण्यासाठी स्वत:साठी 3,000/- रुपये असे एकुण 6,000/- रुपायाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना काही रक्कम कमी करण्या विषयी विनंती केली असता, तडजोडी अंती शासकीय फीस 3000/- रुपये च्या व्यतीरिक्त पी.टी.आर.ला नाव लावण्यासाठी स्वत:साठी 2000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन लाच रक्कम 2000/- रुपये व शासकीय फीस 3000/- रुपये असे एकुण 5000/- रुपये लागलीच घेऊन येण्याचे सांगीतले. त्यावरुन श्री.शंकर शिंदे यांनी श्री.चव्हाण यांचे विरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असुन वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. श्री.शंकर शिंदे यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले. श्री.शंकर शिंदे यांनी नियोजित कारवाईचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकास सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक लाच रक्कम 2,000/-रु. व शासकीय फीस 3000/- रुपये असे एकुण 5000/- रुपये श्री.शंकर शिंदे यांचेकडे हजर केले. त्यावेळी श्री.शंकर शिंदे यांनी शासकीय फीस साठीचे 3000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या सहा नोटा माझे शर्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवुन दिले व लाच रक्कम 2000/-रु. ज्यामध्ये 500/-रु दराच्या 4

नोटाचे नंबर व वर्णन पंच क्रमांक 2 श्री.गायकवाड यांचे करवी नमुद करुन घेतले. लाचेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली व मला लाच स्विकारल्यानंतर श्री.शंकर शिंदे यांना फोनवर फोन करुन " अमर आला का ? " असे बोलण्याचा इशारा नेमुन दिला. त्यानंतर शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मी व पंच क्रमांक 1 श्री.वडचकर यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे श्री.चव्हाण साहेब यांना लाच रक्कम देण्यासाठी नगर परिषद, अंबाजोगाई कडे रवाना केले. श्री.शंकर शिंदे हे सापळा पथकासह आमचे पाठोपाठ आले. मी व पंच क्रमांक 1 श्री.वडचकर असे नगर परिषद, अंबाजोगाई गेलो. तेथे श्री.चव्हाण साहेब माल न दिसल्याने मी त्यांना फोन लावुन कोठे आहेत असे विचारले असता मला चव्हाण साहेब यांनी मला कॉम्प्युटरच्या रुम मध्ये येण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच क्र.1 वडचकर असे गेलो. तेव्हा मी चव्हाण साहेब यांना पैसे आणलेत असे म्हणलो. तेव्हा चव्हाण साहेब, मी व पंच क्र.1 वडचकर असे आम्ही श्री.चव्हाण साहेब यांच्या कक्षात आलो. तेथे चव्हाण साहेब यांनी मला शासकीय फीस भरण्यासाठी फाईल दिली. मी ती फाईल घेवुन जवळ असलेल्या एका महिला कर्मचारी यांचेकडे शासकीय फीस 3000/-रु. माझे शर्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन काढुन महिला कर्मचारी यांचेकडे देवुन 3000/-रुपायाची पावती फाडली. त्यावर मी सदर फाईल घेवुन मी चव्हाण साहेब यांचेकडे गेलो. तेव्हा चव्हाण साहेब यांनी माझेकडील फाईल घेवुन शासकीय फीस भरलेल्या पावतीची झेरॉक्स आणण्यास सांगितली. त्यावर मी सदर पावतीची झेरॉक्स काढुन श्री.चव्हाण साहेब यांचेकडे गेलो. चव्हाण साहेब यांनी माझ्या कडील पावती घेवुन फाईलला लावली. त्यावेळीस श्री.चव्हाण साहेब हे त्यांचे कक्षातुन उठुन बाहेर आले. मी व पंच क्र.1 वडचकर असे त्यांचे सोबत बाहेर आलो. त्यावेळी श्री.चव्हाण साहेब यांनी मला पैशाची मागणीकेल्याने मी माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशातुन लाच रक्कम 2,000/- रुपये काढुन श्री.चव्हाण साहेब यांचे समोर धरुन मोजुन घ्या असे म्हणालो. त्यावेळी श्री.चव्हाण साहेब यांनी उजव्या हाताने लाच रक्कम 2,000/- स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन अंगावर परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवुन दिले. त्यावर मी मला लाच स्विकृतीनंतर करावयाचानेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा श्री.शिंदे साहेब यांना 17.30 वा.फोन करुन केला. इशारा प्राप्त होताच श्री.शंकर शिंदे हे पंच क्र.2 व त्यांचे स्टाफसह आमचे जवळ पोहचले व माझे कडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. तेव्हा श्री.शंकर शिंदे यांनी श्री.चव्हाण यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी पंच क्र.1 वडचकर यांना पंच क्र.2 गायकवाड यांचेसमक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 वडचकर यांनी सांगितले की, तक्रारदार यांचे समोर उभ्या असलेल्या इसमा कडे बोट करुन हेच ते चव्हाण साहेब असुन त्यांनी तक्रारदार यांना पैशाची मागणी करुन स्वत: लाच रक्कम स्वीकारली आहे, असा खुलासा पंच क्र.1 वडचकर यांनी केला. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.चव्हाण यांना लाच रक्कमेबाबत विचारले असता श्री. चव्हाण यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे संािगतले. त्यावर श्री.चव्हाण यांचेकडील लाच रक्कम 2,000/- रु. पंच क्र. 2 गायकवाड यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यावर पंच क्र. 2 गायकवाड यांनी श्री.चव्हाण यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 2,000/-रु. काढुन नोटांचे खात्री केली असता सदर नोटांचे क्रमांक व वर्णन हे सापळा पुर्व कारवाई मधील नमुद नोटांचे क्रमांक व वर्णन हे एकच असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.चव्हाण यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता, त्यांनी त्यांचे नाव आत्माराम जिवनराव चव्हाण, वय 56 वर्ष, कार्यालयीन अधिक्षक, नगर परिषद, अंबाजोगाई रा.एम.आय.टी. रोड, नागझरी परिसर, शेपवाडी ता.अंबाजोगाई जि.बीड असे सांगितले. त्यानंतर आपण घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन आपण श्री.चव्हाण साहेब यांना ताब्यात घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे पोहचलो. केलेल्या कारवाईचा एकत्रित लाचमागणी पडताळणी, सापळा पुर्व व यशस्वी सापळा कारवाई पंचनामा करण्यात आला आहे.

तरी श्री.आत्माराम जिवनराव चव्हाण, कार्यालयीन अधिक्षक, नगर परिषद, अंबाजोगाई रा.एम.आय.टी. रोड, नागझरी परिसर, शेपवाडी ता.अंबाजोगाई जि.बीड यांनी माझे व माझे वडील किसनराव सदाशिव देशमुख यांच्या नावावर असलेले खडकपुरा ता.अंबाजोगाई येथील घराची नोंद पुर्णपणे माझे नावावर करण्यासाठी शासकीय फीस व्यतीरिक्त 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 2000/-रुपये स्विकारण्याचे मान्य करुन, लाच रक्कम 2000/- रुपये दिनांक 18/04/2023 रोजी 17.30 वा. नगर परिषद, कार्यालय, अंबाजोगाई येथे पंचासमक्ष स्विकारली असता लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी श्री.आत्माराम जिवनराव चव्हाण, वय 56 वर्ष, कार्यालयीन अधिक्षक, नगर परिषद, अंबाजोगाई रा.एम.आय.टी. रोड, नागझरी परिसर, शेपवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती प्रिंट काढण्या आगोदर मला वाचुन दाखवली

ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vinod Uttam Gholve(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vinod Uttam Gholve
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलिस ठाणे अमलदार
पो. स्टे. अंबाजोगाई शहर